जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी,सांगली (आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)
(कोविड नियंत्रण कक्ष, जिल्हा परिषद,सांगली)

covid19sangli@gmail.com Tel.No 0233-2373032


जा.क्र.को.नि.क.जिपसां/२८०२/२०२० दि.१४/०९/२०२०

## आदेश

ज्याअर्थी, मा.प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अधिसूचना १) कोरोना/२०२०/सी.आर ९७/आरो-५, दि.३०/०४/२०२० व २) कोरोना/२०२० सी.आर.९७/आरो-५, दि.२१/०५/२०२० प्राप्त झाली आहे. आणि

ज्याअर्थी, सद्यस्थितीत कोरोना आजाराची साथ सुरु असून सदर आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी शासनस्तरावर उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याच्याच एक भाग म्हणून सांगली जिल्हा ग्रामीण क्षेत्रात सुध्दा प्रतिबंधात्मक व उपचारात्मक काम सुरु आहे. सद्यस्थितीत रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता रुग्णांवर उपचार करण्यासाठी जी रुग्णालये बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट,१९४९ (अमेंडमेंट) २००५ अंतर्गत नोंदणीकृत आहेत अशा खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम्स आणि मल्टी स्पेशालिटी रुग्णालये येथे कोविड रुग्णांवर उपचार होणे अपेक्षित आहे. आणि

ज्याअर्थी, **संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलीत, अण्णासाहेब डांगे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अधिनस्त धन्वंतरी हॉस्पिटल आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली** हे खाजगी रुग्णालय बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९, (अमेंडमेंट)२००५ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

त्याअर्थी, मी डॉ.अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी सांगली मला प्राप्त झालेल्या अधिकारास अधीन राहून आदेशित करतो की, **संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलीत, अण्णासाहेब डांगे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अधिनस्त धन्वंतरी हॉस्पिटल आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली हे कोविड रुग्णावंर उपचार करण्यासाठी डेडीकेटेड कोविड हॉस्पिटल म्हणुन तात्काळ आरक्षित करण्यात येत आहे.** त्यानुसार आपल्या रुग्णालयात कोव्हिड रुग्णांसाठी आय.सी.यू व आयसोलेशन वॉर्ड त्वरीत कार्यन्वित करण्यात यावेत व कोविड रुग्णांवर उपचार चालू करण्यात यावेत. त्यासाठी वैद्यकिय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई मार्फत निर्गमित केलेल्या उपचार प्रणालीच्या मार्गदर्शक सुचनांच्या अधीन राहून उपचार करण्यात यावेत.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास अथवा कामात हलगर्जीपणा किंवा टाळाटाळ केल्याचे निर्दशनास आल्यास आपणावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार आणि Section 2(a)(iii) Maharashtra Essential Services Maintenance Act २००५ अन्वये कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच आपल्या आस्थापनेवर कार्यरत सर्व कर्मचारी कर्तव्य ठिकाणी उपस्थित राहून कर्तव्य बजावत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्या विरुध्द उपरोक्त नमुद कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(डॉ.अभिजीत चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी,
सांगली.

प्रति,

**डॉ.सत्येंद्र ओझा, प्राचार्य,**
**संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलीत, अण्णासाहेब डांगे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अधिनस्त धन्वंतरी हॉस्पिटल आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली**

प्रत पुढील कार्यवाहीसाठी ,

**उपविभागीय अधिकारी, वाळवा (इस्लामपूर), जि.सांगली.**

२ /- उपरोक्त संस्थेच्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या उपरोक्त शेवटच्या परिच्छेदात नमुद नुसार सेवा अधिग्रहणाचे आदेश काढण्यात यावेत व वैद्यकिय अधिक्षकांमार्फत संबंधीत रुग्णालयास बजावण्यात यावेत.

**डॉ.विक्रम कदम, वैद्यकिय अधिक्षक, ग्रा.रु.आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली.**

२/- उपरोक्त आदेश संबंधीतांना बजावून त्यांची पोहोच घेवून जिल्हा शल्य चिकीत्सक, सांगली या कार्यालयास सादर करावी.

Scanned with CamScanner